ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

बुधवार, ७ मार्च २०१८

सामना

# ससूनमधील आरोग्यसुविधा सक्षम होण्यासाठी संस्थांनी पुढाकार घ्यावा

## चंद्रकांत दळवी यांचे आवाहन

पुणे, दि. ६ (प्रतिनिधी) - ससूनसारख्या शासकीय रुग्णालयातून गरीब रुग्णांना आधुनिक उपचार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या निधीबरोबरच सामाजिक आणि उद्योग संस्थांच्या सीएसआरचा महत्त्वाचा वाटा आहे. मुकुल माधव फाऊंडेशनसारख्या संस्थांनी पुढाकार घेऊन ससूनमधील आरोग्यसुविधा अधिक सक्षम कराव्यात, असे आवाहन विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी केले.

फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सीएसआर भागीदार असलेल्या मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे एक कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या पचनसंस्थाविकार निदान आणि उपचार केंद्राचे (एण्डोस्कोपी युनिट) आणि रुग्णाच्या नातेवाईकांसाठी सर्व सुविधांनी युक्त प्रतीक्षा कक्षाचे उद्घाटन विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते झाले. मोहिनी व प्रल्हाद छाब्रिया यांच्या स्मरणार्थ हे केंद्र आणि प्रतीक्षा कक्षा उभारण्यात आले आहेत. याप्रसंगी हिंदुजा रुग्णालयाचे डॉ. फिलिप अब्राहिम, लंडन येथील रॉयल कॉलेजचे डॉ. अरविंद शहा, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले, मुकुल माधव फाऊंडेशनच्या संस्थापक संचालिका रितू छाब्रिया, प्रकाश छाब्रिया, ससून रुग्णालयाच्या डॉ. शशिकला सांगळे, डॉ. शीतल महाजन, डॉ. हरीश टाटिया, विनोद रोहानी उपस्थित होते.

डॉ. अजय चंदनवाले म्हणाले, एण्डोस्कोपी केंद्रात एण्डोस्कोपिक रिट्रोग्रेट कोलनजीओ पॅनक्रिटोग्राफी (ईआरसीपी) हे अत्याधुनिक उपकरण बसविण्यात आले आहे. या तपासणीद्वारे खडा (स्टोन), ट्युमर यामुळे होणारे ब्लॉकेज तपासता येईल. या केंद्रामुळे जास्तीत जास्त रुग्णांवर उपचार करणे शक्य होणार आहे.

UCHIT Media : 9767789529